(मुलीचे नांव, वय, पत्ता, नातेसंबंध याविषयी साक्षीदाराकडे प्राथमिक चौकशी केल्यावर, ती तर्कशुध्द आणि सुसंगतपणे उत्तर देत आहे. तिने सांगितले की खोट बोलल्यामुळे पोलीसवाले जेलमध्ये टाकतात. मुलीस खरे बोलण्याचे पावित्र्य माहित आहे म्हणून, मुलीचा ईन–कॅमेरा पुरावा तिची स्थानिक भाषा मराठीमध्ये नोंदविण्यात येतो. मुलीला शपथेबद्दल माहिती नसल्यामुळे शपथ देण्यात आली नाही.)

**(आरोपी जिल्हा मध्यवर्ती कारागृह, परभणी येथून दुरचित्रवाणीव्दारे हजर. व्हीडीओ कॅमेरा बंद व ऑडीओ सुरू ठेवून साक्ष नोंदविली.)**

**( ईन कॅमेरा )**

**साक्षीदाराचे नांव कलम ७२ भारतीय न्याय संहिता, २०२३ (कलम २२८–अ भा.दं.वि.) अन्वये गोपनीय ठेवण्यात येते.**

सरकारपक्षातर्फे सरतपासणी **साक्षीदार क्र.०२**

मी याव्दारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – **एम. डी. ए. (पीडित मुलगी),**

वय – माहित नाही,

व्यवसाय – शिक्षण,

राहणार – ×××, ×××.

**<u>सरतपास सरकारपक्षातर्फे श्री. ए.एन. गिराम, सरकारी वकील</u>**

| | | |
|---|---|---|
| **प्रश्न** | : | तुला किती भाऊ आहेत ? |
| **उत्तर** | : | एक. |
| **प्रश्न** | : | तुला मामा आहेत का ? |
| **उत्तर** | : | हो. |
| **प्रश्न** | : | मामा कुठे राहतात ? |
| **उत्तर** | : | मालेगाव येथे राहतात. |
| **प्रश्न** | : | त्यांना मुले आहेत का ? |
| **उत्तर** | : | हो. |
| **प्रश्न** | : | त्यांची नावे काय आहेत ? |

*३०.०६.२०२६*
*विशेष न्यायाधीश, परभणी.*

| | | |
|---|---|---|
| **उत्तर** | : | ×× व ××. |
| **प्रश्न** | : | तुझेसोबत काही घडले होते का ? |
| **उत्तर** | : | आमच्या घरी एक मुलगा आला होता. त्याने मामाबद्दल विचारले. मामा घरी नव्हता. त्या मुलाने ××चा हात पकडला. त्या मुलाने चॉकलेट देतो म्हणून, मला मामाच्या खोलीमध्ये नेले. त्याने माझे कपडे काढले. त्याने सगळीकडे हात लावले. मी ओरडले. माझे भाऊ आले. भावाने त्याला ढकलले. मी ××× भाऊच्या घरी गेले. |
| **प्रश्न** | : | ××× कोण आहे ? |
| **उत्तर** | : | माझे भावाचा मित्र आहे. |

०१) मला तो आमच्या घरी आलेला मुलगा व ज्याने माझे अंगाला हात लावला दाखविल्यास मी ओळखू शकते.

०२) साक्षीदाराला व्हीडीओ ऑन करून आरोपी दाखविला. साक्षीदाराने तोच असल्याचे ओळखले.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. जे.एस. देशमुख, वकील</u>**

आरोपीच्या वकीलांनी उलटतपासाकरिता पुढील तारीख मिळण्याकरिता अर्ज (नि.क्र.१९) दाखल. अर्ज मंजूर.

वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./-

(आर.एम.सादराणी)

दिनांक – १५.०६.२०२६ विशेष न्यायाधीश, परभणी.

दिनांक – ३०.०६.२०२६

सा.क्र.०२ पीडित मुलगी

**(आरोपी जिल्हा मध्यवर्ती कारागृह, परभणी येथून दुरचित्रवाणीव्दारे हजर. व्हीडीओ कॅमेरा बंद व ऑडीओ सुरू ठेवून साक्ष नोंदविली.)**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. जे.एस. देशमुख, वकील</u>**

०३) मला दोन मामा आहेत. ××× माझी बहिण आहे. मी टीव्ही बघते. मोबाईल बघत नाही. मला कार्टून बघायला आवडते. हे म्हणणे खरे नाही की ××× मामा दारू पिवून माझे मम्मी व ×××× मामा यांना मारहाण करतो. माझी आई माझा लाड करते. मी मम्मीने सांगितलेले सर्व काम ऐकते. मी आज मम्मीसोबत न्यायालयात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की साक्ष काय द्यायची हे मला मम्मीने सांगितले. माझे मामा व मामी माझा लाड करतात, ते मला चॉकलेट व चिवडा देतात. मला इतर कोणीही चॉकलेट दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की मला मामाच्या खोलीमध्ये कोणीही नेले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे कपडे कोणीही काढले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे अंगाला कोणीही हात लावला नाही. हे म्हणणे खरे नाही की याबाबत मी कोणालाही सांगितले नाही. मी पोलीस स्टेशन येथे गेले होते. मी डॉक्टर साहेबांकडे गेले नाही. मला सही करता येते. हे म्हणणे खरे आहे की शाळेतून आल्यानंतर मी माझे भावंडांसोबत खेळते. मालेगांव येथे घरी मामा, मावशी, आई व आजी राहतात. हे म्हणणे खरे नाही की मी मम्मीच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./–

(आर.एम.सादराणी)

दिनांक – ३०.०६.२०२६ विशेष न्यायाधीश, परभणी.

*३०.०६.२०२६*

*विशेष न्यायाधीश, परभणी.*